CNR No. MHWR0300....1980....202

सं.फौ.ख.क्र. 1102 / २०२6

सरकार वि. शशीकांत

निशाणी क्रमांक

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (फौजदारी न्यायालय क्र. १) वर्धा, यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी : वि. प्र. खंदारे)

**भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम २२९ अन्वये**

**किरकोळ अपराधाचा आरोप करण्यात आलेल्या व्यक्तीला विशेष समन्स**

**(फॉर्म क्र. ३१)**

प्रती, : शशीकांत शिवानंद पांडे,
वय : 24 वर्षे, धंदा : हातमजुरी
रा. ग्राम- परसु पूर्वा, तह- कसबा, जि- कन्नोज (उप्र)

तुम्ही, दिनांक 04 / 02 /२०२६ रोजी 8:15 वाजताच्या सुमारास वर्धा रेल्वे स्टेशनचे परिसरामध्ये रेल्वेच्या आरक्षीत कक्षामध्ये विनापरवाना प्रवेश करतांना अथवा अनारक्षित कक्षामध्ये प्रवेश करतांना आढळून आले. त्यामुळे तुम्ही भारतीय रेल्वे कायद्याचे कलम १५५ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे.

सदरच्या प्रकरणामध्ये गुन्हयाचा तपशील नोंदवून त्याबाबत तुमचे प्रतिवेदन नोंदविणे करीता तुमची उपस्थिती आवश्यक आहे. करीता तुम्ही दिनांक 18/05/२०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (फौजदारी न्यायालय क्र. १), वर्धा** येथे स्वत: अथवा वकीलांमार्फत न चुकता हजर राहावे.

तसेच तुम्हांला स्वत: हजर न राहता गुन्हा कबुल करण्याची इच्छा असेल तर वर नमुद तारखेपुर्वी गुन्हा कबुलीचे प्रतिकथन आणि **दंड रक्कम रूपये ५००/—** या न्यायालयास पाठविण्यात यावे. किंवा जर तुम्हांला वकीलांमार्फत उपस्थित होवून गुन्हा कबुल करण्याची इच्छा असल्यास, तुमचे वकीलास त्याबाबत तुमचे गुन्हा कबुलीचे प्रतिकथन देण्यास व दंड रक्कम भरण्यास प्राधिकृत करावे. यात कोणताही कसूर होवू नये.

आज दिनांक १८ माहे [illegible] २०२६ रोजी

न्यायालयाचा शिक्का

सही

मला सदर गुन्हा कबुल आहे. मी उप-नि-श्री. एस. बेळेकर यांना माझेतर्फे गुन्हा कबुलीचे प्रतिकथन देण्यास व दंड रक्कम भरण्यास याव्दारे प्राधिकृत करत आहे.

Shashikant
(शशिकांत पांडे)
आरोपीचे नाव व सही

दि.१८/०५/२०२६

**CNR No. MHWR030019802026**

सं.फौ.ख.क्र. ११०२/२०२६

सरकार वि शशीकांत पांडे

## <u>नि.क्र. ०१ वरील आदेश</u>

आरोपीविरूध्द गुन्हयाचा तपशिल ठेवून त्यास भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम २२९(१) अन्वये विशेष समन्स काढण्यात आला. सदर समन्सला उत्तर देतांना आरोपीने न्यायालयात हजर न राहता त्याचे प्राधिकृत व्यक्तीमार्फत गुन्हा कबुल करून दंडाची रक्कम भरण्याची इच्छा दर्शविली व सोबत सदर रक्कम पाठविलेली आहे. तसेच त्याने त्याबाबत पुरसिस सुध्दा दाखल केलेली आहे.

२. त्यानुसार आरोपीला भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम २७६(२) अन्वये भारतीय रेल्वे कायद्याचे कलम <u>१५५</u> या शिक्षापात्र गुन्हयाकरिता दोषी ठरविण्यात येते व त्याकरीता रूपये ५००/— द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येते.

३. याप्रमाणे आरोपीतर्फे सादर करण्यात आलेली दंडाची रक्कम <u>रूपये ५००/—</u> स्विकारण्यात येवून ती सरकार जमा करण्यात यावी. तसेच आरोपीने गुन्हा कबुल केल्याने प्रकरण दफ्तर दाखल करण्यात यावे.

४. प्रस्तुत प्रकरण हे ई—फाईल्ड (e-filed) असून प्रस्तुत आदेश / न्यायनिर्णय हा डिजिटली स्वाक्षरी (Digitally Signed) करण्यात आलेला आहे; त्यामुळे त्याची कोणतीही छापील प्रत न ठेवता केवळ डिजिटली सही करण्यात आलेला आदेश न्यायालयाच्या सी.आय.एस. प्रणालीवर अपलोड करण्यात आलेला आहे.

५. त्यामुळे सदर न्यायनिर्णय / आदेश याबाबत प्रमाणित प्रत (Certified Copy) मिळणेकरीता अर्ज आल्यास रजिस्ट्रीव्दारे अर्जदाराला न्यायालयाच्या सी.आय.एस. प्रणालीवर अपलोड करण्यात आलेल्या डिजिटल सहीच्या आदेशाची छापील प्रत काढून ती प्रमाणित करून देण्यात यावी.

दिनांक : १८/०५/२०२६
स्थळ : वर्धा.

18/05/2026
( वि. प्र. खंदारे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)

Received Amt of Rs. 500/- (In Words Rs. five hundred Only) as a fine Amount Sr. Clerk 753